मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 1835 वाहनांवर आरटीओची कारवाई

## फिटनेस सर्टिफिकेट नसलेल्या वाहनांना प्रतिदिन पन्नास रुपये : वाहनांना पुन्हा नोटिसा बजावण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

फिटनेस सर्टिफिकेट नसलेल्या वाहनांना आता विलंब शुल्क म्हणून प्रतिदिन पन्नास रुपये आकारले जाणार आहेत. त्याबाबत आरटीओच्या वतीने माहिती गोळा करण्यात येत आहे. त्यानुसार त्या त्या वाहनांना पुन्हा नोटिसा बजावण्यात येणार आहे. दरम्यान, आत्तापर्यंत फिटनेस नसलेल्या १८३५ वाहनांवर कारवाई केली आहे, तर त्यांच्याकडून ७० लाख ४२ हजारांचा दंड वसूल केला आहे.



पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाच्या एप्रिल २०२३ ते एप्रिल २०२४ दरम्यान ही कारवाई करण्यात आली आहे. आता नव्याने नियमानुसार दंडात वाढ होणार असून, या विरोधात वाहतूक संघटना एकटवल्या आहेत. दरम्यान, सद्यस्थितीत फिटनेस थकलेल्या वाहनांची माहिती आरटीओच्या वतीने काढण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नव्या नियमानुसार दंडामध्ये देखील वाढ होणार आहे. रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांना फिटनेस सर्टिफिकेट (योग्यता प्रमाणपत्र) अनिवार्य असते. अन्यथा ते वाहन आरटीओच्या वतीने अटकवूनदेखील ठेवले जाते. फिटनेस तपासणी दरम्यान ब्रेक चाचणी, टायर, वायपर, हॉर्नची तपासणी, हेड लॅम्प, टेल लॅम्प, ब्रेक लॅम्प, इंडिकेटर आणि अन्य दिव्यांची तपासणी तसेच चॅसी व इंजिन क्रमांकाची खातरजमा, स्पीड गव्हर्नरच्या सुस्थितीची तपासणी केली जाते. फिटनेस सर्टिफिकेट नसणारे वाहन बेकायदेशीर ठरवण्यात येते. असे वाहन रस्त्यावर धावत असल्यास अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. अनेक वाहनचालक त्याकडे दुर्लक्ष करतात.

वाहनांची तपासणी करून घेण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे बऱ्याच वेळा अपघात होतात. याबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर परिवहन विभागाने केंद्र शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

### फिटनेस सर्टिफिकेट नसलेल्या वाहनांवर कारवाई

» फिटनेस सर्टिफिकेट नसलेल्या वाहनांना आता विलंब शुल्क म्हणून प्रतिदिन पन्नास रुपये आकारले जाणार आहेत. त्याबाबत आरटीओच्या वतीने माहिती गोळा करण्यात येत आहे. त्यानुसार त्या त्या वाहनांना पुन्हा नोटिसा बजावण्यात येणार आहे. दरम्यान, आत्तापर्यंत फिटनेस नसलेल्या १८३५ वाहनांवर कारवाई केली आहे, फिटनेस नसलेल्या वाहनांकडून ७० लाख दंड जमा, सद्यस्थितीत फिटनेस थकलेल्या वाहनांची माहिती काढण्यास सुरुवात केली आहे,

### असा केला जाणार दंड वसूल

» प्रमाणपत्रासाठी ऑटो रिक्षा, छोटा टेम्पो, सर्व तीनचाकी अशा लहान वाहनांसाठी ६०० रुपये, तर बस, ट्रेलर्स सारख्या मोठी अवजड वाहनांसाठी ८०० रुपये खर्च येतो. दर दोन वर्षांनी प्रमाणपत्राचे नूतनीकरण न केल्यास प्रतिदिन ५० रुपये दंड आकारला जाणार आहे. याबाबत संबंधित वाहनचालकाला नोटीस देण्यात येते. तसेच, रस्त्यावर धावत असलेल्या या वाहनांची तपासणी देखणी केली जाते. फिटनेस सर्टिफिकेटची वैधता संपल्यास ऑनलाइन प्रणालीत हा दंड आपोआप लागून येणार आहे.

# वाढत्या अतिक्रमणाने आयटी पार्क बकाल!

## अनधिकृत दुकानामुळे वाहतूक कोंडीत भर, रस्ता रुंदीकरण आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न सुटला नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी परिसरात ठिकठिकाणी रस्त्यालगत होत असलेल्या अतिक्रमणामुळे 'आयटी पार्क' चा बकालपणा वाढला आहे. तसेच रस्त्याला लागून असलेल्या अनधिकृत दुकानामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असून, त्यामुळे अनेक प्रश्न प्रलंबित राहिले आहेत. पीएमआरडीए , एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायत या वेगवेगळ्या विभागामुळे रस्ता रुंदीकरण आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न सुटला नाही. परिणामी, बेकायदेशीरपणे थाटलेल्या दुकानांमुळे आयटी पार्कचे अशाप्रकारे विद्रूपीकरण झाले आहे.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये शेकडो कंपन्या आहेत. त्याकडे जाणारे रस्ता प्रशस्त आहे. मात्र, अनेक ठिकाणी रस्त्यालगतच्या मोकळ्या जागेचा टपरी, हातगाडी आणि दुकानमालकांनी ताबा घेतला आहे. हळूहळू त्यांचे बिऱ्हाड रस्त्यावर येऊन पोहोचले आहे. त्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. गेल्या अनेक महिन्यापासून या समस्येमुळे वाहन चालक त्रस्त झाले आहेत. ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करत असून, यावर कारवाई करणार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.





संबंधित व्यापारी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांची मिलीभगत असल्याने यावर कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. त्यामुळे ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. हिंजवडी टप्पा १ ते टप्पा ३ रस्ता, हिंजवडी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्ता, लक्ष्मी रोड ते हिंजवडी रस्ता या प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात दुकान आणि टपरीधारकांनी अतिक्रमण केले आहे. यामुळे आधीच अरुंद असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

### समन्वयाचा अभाव

» हिंजवडी परिसरातील रस्ते ताब्यात न आल्याने या ठिकाणी रुंदीकरणाची कामे अडली आहेत. परिणामी, रस्त्यांवर अतिक्रमण फोफावू लागले आहे. पीएमआरडीए, पीडब्ल्यूडी आणि स्थानिक पोलीस या विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे. पीएमआरडीने पत्रव्यवहार करूनदेखील पीडब्ल्यूडी विभागाकडून कारवाई होत नसल्याने हा प्रश्न दुर्लक्षित राहिलेला आहे.

# म्हाडा मुख्याधिकाऱ्यांच्या नावे लाच

## दोन लाख 70 हजारांची लाच घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण विकास मंडळाच्या (म्हाडा) योजनेतील सदनिका फेरवितरण पद्धतीने मिळवण्यासाठी अर्ज केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या नावे दोन लाख ७० हजारांची लाच घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली.

म्हाडा योजनेतील सदनिका फेरवितरण पद्धतीने मिळवण्यासाठी अर्ज केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या नावे दोन लाख ७० हजारांची लाच घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. पुणे स्टेशन परिसरातील एका हॉटेलच्या परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिजीत व्यंकटराव जिचकार (वय ३४, रा. वाकड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.



याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) एका ६० वर्षीय तक्रारदाराने तक्रार दिली होती. आरोपी अभिजीत म्हाडा कार्यालयात कंत्राटी कर्मचारी आहे. तक्रारदार सेवानिवृत्त आहेत. म्हाडाच्या सोडतीत त्यांना सदनिका मिळाली होती.

पण, त्यासाठी नेमकी किती रक्कम भरायची, याबाबतची माहिती त्यांना नव्हती. सदनिकेची किंमत ९० लाख रुपये होती. त्यामुळे तक्रारदार सदनिका व्यवहारातील हप्ता भरलेला नव्हता. त्यामुळे सदनिका हस्तांतरणाची प्रक्रिया रखडली होती. त्यासाठी तक्रारदार यांनी सदनिकेचे फेर वितरण होण्याबाबत आणि त्याचे चलन (आरटीजीएस) चलन मिळण्यासाठी म्हाडाच्या कार्यालयात अर्ज दिला होता. या सर्व प्रक्रियेसाठी जिचकार यने लाच मागितली होती.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक नितीन जाधव आणि पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक वीरनाथ माने तपास करत आहेत.

महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण विकास मंडळाच्या (म्हाडा) योजनेतील सदनिका फेरवितरण पद्धतीने मिळवण्यासाठी अर्ज केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या नावे दोन लाख ७० हजारांची लाच घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. पुणे स्टेशन परिसरातील एका हॉटेलच्या परिसरात ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लाच घेताना रंगे हाथ पकडलं

» म्हाडाच्या पुणे कार्यालयातील मुख्याधिकारी अशोक पाटील आणि कंत्राटी कर्मचारी अभिजित जिचकार याची तक्रारदार यांनी भेट घेतली. या सदनिकेचे फेरवितरण करून आरटीजीएस चलन देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदार यांनी एसीबीकडे लेखी तक्रार दाखल केली. आरोपी जिचकार याने तक्रारदार यांच्याकडे त्यांची सदनिका पुन्हा वितरित करून आरटीजीएस चलन काढून देण्यासाठी मुख्याधिकारी अशोक पाटील यांच्यासाठी 2 लाख 20 हजार रुपयांची आणि स्वत:साठी 50 हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. जिचकार याने तक्रारदार यांना पुणे स्टेशन परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये बोलाविले. शुक्रवारी रात्री हॉटेलच्या परिसरात सापळा लावून 2 लाख 70 हजार रुपये लाच स्वीकारणाऱ्या जिचकार याला पकडण्यात आले.

# शहर अडकले, सायबर चोरट्यांच्या जाळ्यात

## ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक शेअर ट्रेडिंगचे आमिष, नेहमीच्या फंड्यातून 7 जणांची 92 लाखांची फसवणूक

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात सायबर चोऱ्या, फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे. नेहमीचेच फंडे वापरले जात असतानाही नागरिक चोरट्यांचा जाळ्यात फसत आहेत. सायबर चोरट्यांकडून उच्चशिक्षित बरोबर महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना टार्गेट केलं जात आहे. कमी वेळेत पैसे, पार्ट टाईम जॉब, मनी लॉन्डरिंगचा आरोप अशी विविध कारणे सांगून फसवणूक करत असल्याचे चित्र आहे. सायबर चोरटयांनी ७ जणांची ९१ लाख ९८ हजार ९८२ रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

सायबर चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाला एनपीसीआय फाईलची रक्कम मिळवून देण्याचे आमिष दाखवून २५ लाख ६९ हजार २९७ रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी सेनादत्त पेठ येथे रहाणाऱ्या ७२ वर्षीय व्यक्तीने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संपर्क करणाऱ्या करणदीप आणि मित्तल यांच्यवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नोव्हेंबर २०२२ ते गुन्हा दाखल होईपर्यंतच्या काळात ही घटना घडली आहे. पोलीस निरीक्षक घोडके तपास करत आहेत.

शेअर मार्केट मधून नफा मिळवून देण्याच्या आमिषाने एका महिलेची २२ लाख ५ हजारांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी उंड्री येथे रहाणार्या ४८ वर्षीय महिलेने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्याने फिर्यादी महिलेशी संपर्क करून अनुराग ठाकूर बोलत असल्याचे सांगितले. यानंतर फिर्यादी महिलेला स्टॉक ट्रेडिंग मध्ये पैसे कमवायचे आमिष दाखवून केकेआरसीए अप्लिकेशन डाऊनलोड करायला लावून पैसे पाठवायला लावून फसवणूक केली आहे.



### ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

» सायबर चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाला एनपीसीआय फाईलची रक्कम मिळवून देण्याचे आमिष दाखवून २५ लाख ६९ हजार २९७ रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी सेनादत्त पेठ येथे रहाणाऱ्या ७२ वर्षीय व्यक्तीने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संपर्क करणाऱ्या करणदीप आणि मित्तल यांच्यवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नोव्हेंबर २०२२ ते गुन्हा दाखल होईपर्यंतच्या काळात ही घटना घडली आहे. पोलीस निरीक्षक घोडके तपास करत आहेत.

### शेअर मार्केट नफ्याचे आमिष

» शेअर मार्केट मधून नफा मिळवून देण्याच्या आमिषाने धनकवडी येथील २८ वर्षीय तरुणीची ८ लाख ३६ हजारांची फसवणूक करण्यात आली आहे. सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. तसेच, कॅन्टीन मधील कामगार बोलत असल्याचे सांगून सायबर चोरटयांनी आळंदी रोड इथे राहणाऱ्या एका व्यक्तीची ९५ हजारांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी विश्रांतवाडी पोलीस


# उड्डाणपुलावरील रस्त्यावर पडले भगदाड

## उड्डाणपुलावर 90 कोटी खर्चून देखील रस्ता खचला कसा? नागरिकांना पडला प्रश्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी येथील भक्ती-शक्ती चौक हा पिंपरी-चिंचवड शहरातील गजबजलेला परिसर आहे. प्राधिकरण, स्पाइन रोड, किवळे मुकाई चौक आणि जुना मुंबई-पुणे रस्ता या चौकात एकत्र येतो. भक्ती-शक्ती चौक ते मुकाई चौक हा ४५ मी. रुंदीचा बीआरटीएस रस्ता विकसित झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरून थेट भक्ती-शक्ती या चौकात नागरिक येत आहेत. या चौकातील बीआरटीएस टर्मिनलमुळे नागरिकांची प्रचंड गर्दी असते. या चौकातून चिखली, तळवडे आयटी पार्क येथून हिंजवडी आयटी पार्ककडे जाणाऱ्या वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी कायम वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे महापालिकेने या ठिकाणी उड्डाणपूल बांधला आहे.

महापालिकेने भक्ती-शक्ती चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेतला. शहराच्या प्रवेशद्वारावरच वाहतूक कोंडी होऊ लागल्याने महापालिकेवर वारंवार टीका होत होती. भक्ती-शक्ती चौकातील उड्डाणपूल या प्रकल्पावर पालिकेने एकूण ९० कोटी ५३ लाख रुपये खर्च करून डिसेंबर २०१९ अखेरपर्यंत हे काम पूर्ण केले. यामध्ये हॉटेल पूना गेट ते श्रीकृष्ण मंदिरापर्यंत ये-जा करणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र पूल तयार केला. प्राधिकरणातून भोसरी, पुणे व मुंबईकडे जाण्यासाठी स्वतंत्र पूल उभारण्यात आला. स्पाईन रस्त्याला समांतर ग्रेड सेपरेटर केला आहे. ये-जा करणा-या वाहनांसाठी स्वतंत्र लेन आहे. त्यामुळे प्राधिकरण व मोशी हा दक्षिण व उत्तर वाहतुकीमुळे शहर जोडले गेले आहे.



> निगडीच्या अंकुश चौकातून भक्ती-शक्ती उड्डाणपुलाकडे जाताना रस्ता खचला आहे. त्या ठिकाणी पुलावर भगदाड पडले आहे. भगदाडाशेजारी भाग पूर्णपणे पोकळ झाला असून त्यावर वाहन गेल्यास रस्ता आणखी खचून अपघात होण्याची दाट शक्यता आहे. हा उड्डाणपूल रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केले आहे. आयुक्तांनी तत्काळ दखल घेऊन उड्डाणपुलावरील रस्त्याची दुरुस्ती करावी. संबंधित ठेकेदार कंपनीवर गुन्हा दाखल करून काळ्या यादीत टाकावे,
>
> \- सचिन काळभोर, चिटणीस, शहर भाजप, पिंपरी-चिंचवड

### आयुक्तांकडे तक्रार

» निगडी येथील अंकुश चौक मार्गे भक्ती शक्ती उड्डाणपूल ह्या ठिकाणी रस्ता खचला आहे. महापालिका स्थापत्य विभागाने अंकुश चौक मार्गे भक्ती-शक्ती उड्डाणपूल ह्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता निकृष्ट दर्जाचा बनवला आहे. त्यामुळे उड्डाणपूल वर जाताना रस्ता खचून भगदाड पडले आहे. या शेजारी रस्ता पोकळ झाला असून वाहनाची ये - जा झाल्यास अपघात होण्याची दाट शक्यता आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी ताबडतोब दखल घेऊन उड्डाणपूल रस्ता दुरुस्ती करण्यात यावी, अशी तक्रार करण्यात आली आहे.

नाशिक महामार्गावरून देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्गाकडे जाणारी जड वाहने ग्रेड सेपरेटरमधून ये-जा करत आहेत. वर्तुळाकार पूल हा साठ मीटर व्यासाचा आहे. तीन लेनच्या मार्गांची रुंदी साडेपंधरा मीटर आहे. जुन्या पुणे-मुंबई महामार्गास समांतर असा एकसष्ट मीटर रुंदीच्या ग्रेड सेपरेटर तयार केला आहे. दरम्यान, निगडीच्या अंकुश चौकातून भक्ती-शक्ती उड्डाणपुलावर ह्या ठिकाणी रस्ता खचला आहे. हा रस्ता खचून त्यावर भगदाड तयार झाले आहे. त्याच ठिकाणी रस्ता पोकळ झाला असून त्यावरून वाहन गेले तर आणखी मोठे भगदाड तयार होणार आहे. त्या उड्डाणपुलावर हजारो वाहनांची ये-जा असते. त्यामुळे रस्ता खचून अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

. उड्डाणपुलावर हे भगदाड पडले असताना त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. हा रस्ता खचला असून त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. संबंधित उड्डाणपुलाचे तत्काळ दुरुस्ती करावी, त्या ठेकेदार कंपनीला काळ्या यादीत टाकून नुकसान भरपाई घ्यावी, संबंधित अधिकाऱ्यांना दोषी धरून कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

# मतमोजणीमुळे बालेवाडी परिसरात वाहतुकीत बदल

## वाहतूक कोंडीमधून होणार सुटका, मेट्रो मार्गाचे काम येत्या दोन वर्षांत पूर्ण होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये मावळ लोकसभा मतदारसंघाची मंगळवारी (ता.४) मतमोजणी होणार आहे. यावेळी विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने परिसरातील रस्त्यावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, ही मतमोजणी शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी परिसरातील विविध मार्गांवरील वाहतुकीत पोलिसांकडून बदल करण्यात आला असून वाहनतळाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.



### अवजड वाहनांना प्रवेश बंद

» म्हाळुंगे गाव ते राधा चौक या मार्गावर मंगळवारी पहाटे पाच ते रात्री साडेअकरा यावेळेत जड व अवजड वाहनांना प्रवेश बंद राहणार आहे. चांदे - नांदे येथून येणारी जड अवजड वाहने गोदरेज सर्कल येथून डावीकडे वळून माण मार्गे हिंजवडी येथून पुढे जातील. बाणेर व राष्ट्रीय महामार्गावरून येणारी वाहने, अवजड वाहने राधा चौकातून उजवीकडे वळून वाकड नाका मार्गे हिंजवडी व पुढे जातील. हा बदल मंगळवारी पहाटे पाच ते रात्री आवश्यकतेनुसार गर्दी संपेपर्यंत अथवा वाहतूक सुरळीत होईपर्यंत राहणार आहे.

### कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी येथे असेल व्यवस्था

» म्हाळुंगे पोलिस चौकी ते उत्तम स्वीट चौक या मधला रस्ता महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. याठिकाणी येणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या वाहनांसाठी राधा चौकातून पुढे डाव्या बाजूला खंडोबा मंदिराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.ऑर्किड हॉटेल हायवे गेटपासून सुरु होणारा सेवा रस्ता हा मुळा नदी पुलापर्यंत रहदारीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. हा रस्ता महायुतीच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांसाठी वाहनतळ व्यवस्था त्या सेवा रस्त्यावर करण्यात आली आहे.इतर पक्षांचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते यांच्यासाठी माध्यमिक विद्यालय, म्हाळुंगे या शाळेत वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

क्रीडा संकुलाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील उत्तम स्वीट चौक ते म्हाळुंगे पोलिस चौकीपर्यंतचा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहे. चांदे - नांदे व म्हाळुंगे गावातून येणारी वाहने उत्तम स्वीट चौक येथून उजवीकडे वळून म्हाळुंगे पोलिस चौकी येथून पुढे राधा चौकाकडे व इच्छितस्थळी जातील. तसेच राधा चौकातून येणारी वाहने म्हाळुंगे पोलिस चौकी येथून डावीकडे वळून पुढे म्हाळुंगे गाव, चांदे- नांदे व पुढे इच्छितस्थळी जातील.

# उजनीत इतिहासातील नीचांकी पाणीपातळी

## उसाचे क्षेत्र कमी होण्याची शक्यता अनेक पाणीयोजना बंद : प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणाने आज तळ गाठला असून उजनीच्य 45 वर्षांच्या इतिहासातील 59. 67 टक्के वजा गेल्याने उजनीकाठच्या शेतकऱ्यांच्या तोंडाचे पाणी पळाले आहे.

मागील पावसाळा हंगामामध्ये उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरू शकले नाही. तर उजनीच्या पाण्याचे प्रशासनाकडून व्यवस्थित नियोजन झाले नसल्याची तक्रार शेतकरी करत आहेत. पाण्याचा बेसुमार वापर झाल्याने धरणाच्या पाण्याने लवकरच आणि नीचांकी पाणी पातळी गाठली. गेल्या 45 वर्षांच्या इतिहासात पाणीपातळी पहिल्यांदाच एवढी खाली गेल्याने या उजनी धरणावरील पुणे, सोलापूर, नगर जिल्ह्यातील अनेक औद्योगिक संस्था, सहकारी पाणीपुरवठा संस्था, ग्रामपंचायत पाणीपुरवठा आणि शेतकऱ्यांनी केलेले सिंचन व्यवस्था या सगळ्या बंद पडण्याच्या मार्गावर आलेले आहेत. तर काही ठिकाणी बंदही झाल्या आहेत. तर ही उजनी धरणपाणलोट क्षेत्र भीमानगर ते दौंड असे असून सध्या पाण्याची पातळी आटली आहे. तर काही ठिकाणी पात्र मात्र भिगवणपर्यंत फक्त नाल्यासरखे राहिले असून, हे उजनी धरण आहे की कोणती नदी आहे हेच ओळखता येत नाही..

उजनीच्या पाण्यावर अवलंबून शेतकऱ्यांनी बँकांची भरमसाठ कर्जही उचलली आहेत. हातातोंडाशी आलेली पिके डोळ्या देखत जाळून जात आहेत. केलेला खर्च ही निघणार नाही. आता कर्ज कसे फेडणार या चिंतेत आहे. या हंगामात उसाचेही क्षेत्र कमी होण्याची श्यक्यता वर्तवण्यात येत आहे. काहीही असो शेतकऱ्याचा एक हंगाम पाण्यावाचून वाया गेला तर शेतकरी किमान दोन वर्षे तरी तोट्यातून बाहेर येत नाही. त्यामुळे उजनीतील पाण्याचे योग्य नियोजन हवे, अशी मागणी जोर धरीत आहे.



> उजनीच्या पाण्याचे नियोजन हे व्हायला हवे होते पण तसे झाले नाही. याबाबत मी राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना लवकरच भेटणार आहे. उजनी धरणाच्या मूळ पाणी आराखड्यानुसार पाणी नियोजन व्हायला हवे याची मागणी करणार आहे. तसेच सोलापूर जिल्ह्याचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटायला हवा.
>
> \- हर्षवर्धन पाटील, माजी सहकारमंत्री

### पाण्याचे राजकारण जीवावर बेतणारे

» पाऊस सुरू होण्यास अजून बराच कालावधी आहे. त्यात आता राहिलेली पिके जागतील का नाही याची शाश्वती नाही. शेतकरी अडचणीत आला आहे. चार पिके यावर दुधाचा व्यवसाय अवलंबून आहे. अशा बऱ्याच न दिसणाऱ्या अडचणींना शेतकरी तोंड देत आहे. विकासाच्या नावाखाली पाण्याचे राजकारण शेतकऱ्यांच्या जीवावर बेतत आहे.

### नीरा नदी कोरडीठाक

» इंदापूर तालुक्याच्या दोन्ही बाजूंनी नीरा आणि भीमा नदी असून या दोन्ही नद्यांवर ते इंदापूरचा विकास अवलंबून आहे. तर सध्या नीरा नदी गेले दोन ते तीन महिने झाले कोरडीठाक आहे. चिमणीला सुद्धा पिण्यासाठी पाणी नाही, अशी अवस्था आहे. नदीवरील बंधारे वाळू माफियांनी उद्ध्वस्त करून सोडले आहेत. तर काही ठिकाणी नदीने आपले पात्र सुद्धा बदललेले आहे. त्यामुळे नीरा नदीमध्ये सोडलेले पाणी हे नीरा नदीच्या बंधाऱ्यामध्ये राहिलच याची गॅरंटी नाही. म्हणून इंदापूर तालुक्यातील नीराकाठचा शेतकरी भयानक पाणीटंचाईच्या अवस्थेला तोंड देत आहे.

# पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात कॅफे संस्कृतीचा शिरकाव

## ग्रामीण भागातील ठराविक कॅफेत अश्लील चाळ्यांचा बाजार : पोलिसांचे दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या पुणे जिल्ह्यातील पोर्शे कार व हिट अँड रण प्रकरणामुळे पब चांगलेच चर्चेत आले असून या पबमुळे युवा पिढी व्यसनाधीन झाल्याचे आणि पबमुळे त्यांच्या व्यसनाला आसरा मिळत असल्याचे दिसून येत आहे. शहरी भागातील पब व ग्रामीण भागातील ठराविक कॅफे युवक व युवतींना वाम मार्गाला घेऊन जात असल्याचे दिसून येत असल्याने हा धोका असल्याचे दिसत आहे.

पुणे जिल्ह्यात पबमधून निघालेल्या युवकाकडून घडलेला भयानक अपघात देशभरात गाजत असून या अपघाताने वेगेळे वळण घेतल्याने काही पोलीस अधिकारी तसेच डॉक्टरांवर कारवाई होऊन निलंबन झाले. मात्र, शहरी भागामध्ये जसे पब धोकादायक आहेत. त्या पद्धतीने ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालयच्या शेजारी असलेले कॅफे हे युवक व युवतींना वेगळ्या वळणावर घेऊन जात आहे.

अनेक कॅफे चालकांनी कॅफे व हॉटेलमध्ये बेकायदेशीर पार्टीशन टाकून पडदे लावून युवकांना अश्लील चाले करण्यासाठी एक आसरा दिल्याचे उघड झाले आहे. यापूर्वी शिरुर तालुक्यात काही ठिकाणी पोलिसांनी कारवाया केल्या आहेत. मात्र, त्यांनतर परिस्थिती जैसे थे अशी स्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी कॅफे चालकांनी युवक व युवतींना बसण्यासाठी अलिशान पद्धतीने सोय केली आहे. त्या ठिकाणी येणाऱ्या युवकांना बसण्यासाठी सवलत देऊन त्यांच्याकडून ठराविक रक्कम घेतली जात आहे.

कित्येक ठिकाणी युवतींचे विनयभंग झाल्याच्या घटना ताज्या आहेत. कॅफेमध्ये येणारे जाणारे सर्वच युवक युवती अल्पवयीन असून काही युवक अलिशान दुचाक्या घेऊन भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याने कित्येक अपघात घडत आहेत. प्रशासन तसेच पालक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत.



### गाळा मालकांनी लक्ष द्यावे

» ग्रामीण भागामध्ये असेलली कॅफे पद्धत चांगली आहे. मात्र त्यामध्ये युवक व युवतींसाठी करण्यात येणारी स्वतंत्र व्यवस्था ही बंद झाली पाहिजे, संबंधित जागा मालक अथवा गाळा मालकांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पोलीस प्रशासनाने देखील यावर अंकुश ठेवणे गरजेचे असल्याचे सीमाई महिला आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा सीमा पवार यांनी सांगितले.

### पोलिसांची हप्तेखोरी बंद करा

» शिरूर तालुका हा औद्योगिक आणि नागरिकीकरणामुळे सधन झाले आहे. रांजणगाव एमआयडीसीमुळे या भागात नागरिकीकरणाचा वेग वाढला आहे. उद्योग- व्यवसायाची चलती आहे. यातून अनेक डिकाणी गैरमार्गाने माया कमविली जात आहे. यात पोलीस हात धुऊन घेत आहेत. अवैद्य व्यवसाय सुरू झाल्यानंतर पोलिसांना बंद पाकिट दिले जात असल्याची चर्चा आहे. जोपर्यंत हप्तेखोरी थांबली जात नाही. तोपर्यंत हे व्यवसाय खुलेआमपणे सुरू राहणार आहेत. यासाठी सामाजिक संघटनांनी पोलिसांची हप्तेखोरी बंद करण्यासाठी आवाज उठविण्याची गरज आहे.